KOLHAPUR ENGINEERING ASSOCIATION

ईएसआयसी च्या सुविधांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा- संतोष माळवी

ईएसआयसी च्या सुविधांमध्ये पहिल्यापेक्षा अधिक जादा सोई सुविधा उपलब्ध केल्या असून एखाद्या कारखान्यात १० कामगार काम करत असले तरी सुध्दा ईएसआयच्या विविध वैद्याकिय सेवेचा लाभ मिळू कर्मचा-यास मिळू शकतो, त्यामुळे प्रत्येक कारखान्याच्या एचआर व्यवस्थापनाने ई पेहचान कार्ड भरताना कोणत्याही त्रुटी राहू नये याची काळजी घेतल्यास कामगारांना व त्यांच्या संपूर्ण कुटुबीयांना त्याचा अधिकाधिक लाभ होईल, असे आवाहन ईएसआयसीचे शाखाव्यवस्थापक संतोष माळवी यांनी केले.

मा. जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी दिलेल्या आदेशानुसार ईएसआयसी हॉस्पिटलने कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनमध्ये कोल्हापुरातील औद्योगिक संघटना व त्यांचे प्रतिनिधी, एचआर व्यवस्थापक यांना ईएसआय संदर्भातील नवीन माहिती देणे तसेच ईएसआयसी रुग्णालयात सुरु असलेल्या विविध सेवा सुविधांची, तसेच मालक व कामगार यांच्या समस्या व प्रश्न काय असतील तर त्याबाबत निर्णय घेण्यासाठी ही कार्यशाळा आयोजित केली होती त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यशाळमध्ये शाखा व्यवस्थापक संतोष माळवी तसेच सहाय्यक राजेंद्र शिखरे, डॉ. सोमनाथ घोंगडे, डॉ. हेमंत यादव यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना उद्योजक विज्ञान मुंडे म्हणाले की, खासदार श्री.संजय मंडलीक यांच्या प्रयत्नामुळे कोल्हापूर औद्योगिक क्षेत्राच्या परिसरात देशात प्रथमच ईएसआयसी सेवा कोल्हापूर जिल्हयात देण्यात येत आहे आणि या मॉडेलचा स्वीकार आता शासनही करत आहे.  त्याचबरोबर ईएसआयसीच्या हॉस्पीटल बरोबरच इतर खासगी सेवा १६ रुग्णालयांमार्फत कर्मचा-यांना वैद्यकिय सेवा सुविधा पुरविल्या जात आहेत.  तसेच ही सेवा आणखी सुलभ होण्यासाठी संलग्न रुग्णालयाची संख्या वाढवण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. कर्मचा-यांच्या आरोग्याची तसेच त्याच्या कुटुंबाची हेळसांड होऊ नये यासाठी ईएसआयकडून जिल्हयात २७ सेकंडरी हॉस्पिटल्स, तर दुर्धर आजारांवर उपचार करण्यासाठी १६ मल्टीस्पेशालिटी रुग्णालयांशी टायअप झाल्याचे ते म्हणाले. त्यामुळे रुग्णांनी सेवेचा संलग्न रुग्णालयांमध्येच लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. तसेच लोकल केमिस्टकडून औषधे उपलब्ध होण्यासाठी सोय केली असल्याचेही त्यांनी नमूद केले. ईएसआयसी

हॉस्पिटलमध्ये ६ हायर मॉड्युलर ऑपरेशन्स सेंटर सुरू होत आहेत,  कान, नाक, घसा, डोळे, हाडांवरील उपचार, सीटी तसेच एमआरआय स्कॅन खासगी हॉस्पीटलच्या सहकार्याने सुविधा सुरु केली आहे, यासाठी आशा नेत्रालय, डी. वाय. हॉस्पिटल आणि ॲस्टर आधार या ठिकाणी उपचारांसाठी सोय करून दिली असल्याचे ते म्हणाले.

त्याच बरोबर मार्च २०२३ पर्यंत पूर्ण क्षमतेने ईएसआयसी हॉस्पिटल सुरु करण्यासाठी नियोजन करित आहोत. औद्योगिक क्षेत्रात रविवारी व सोमवारी सुट्टीच्या दिवशी रुग्णालयात डॉक्टर उपलब्ध करून देणार असल्याचे ते म्हणाले.

किडनीवरील ट्रान्सप्लाण्ट व त्यानंतरचे औषध उपचारही ईएसआसीकडून मोफत केले जात आहेत. कोरोना बाधितांना सुद्धा  ईएसआयसी सुविधांचा लाभ घेता येऊ शकतो, मात्र त्यासाठी ७० दिवसांचे, तर गंभीर आजारांवरील उपचारासाठी दोन वर्षांचे कॉन्ट्रीब्युशन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

ईएसआयसी सेवा अधिकाधिक सुलभ आणि वेगवान होण्यासाठी एचआर विभागासाठी स्वतंत्र कार्यशाळा घेणार असल्याचे ते म्हणाले. शहरातील औद्योगिक वसाहतीमध्ये रुग्णालय उभारणीसाठी केईएने प्रस्ताव द्यावा असे आवाहनही त्यांनी केले.  कोल्हापूर शहरात आणखिन एक सेवा रूग्नालय सुरू करण्यासाठी कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनने एक प्रस्ताव द्यावा अशीही चर्चा झाली.

तक्रार निवारण केंद्राची स्थापना

ईएसआयसीकडून देण्यात येत असलेल्या सुविधा या पूर्णपणे मोफत आहेत. तसेच तक्रार निवारण केंद्राची स्थापना करण्यात आली असून कर्मचा-यांना काही सूचना किंवा तक्रार करायची असल्यास लेखी तक्रार द्यावी असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, कार्यशाळेमध्ये शाखाव्यवस्थापक संतोष माळवी यांचे पुष्पगुच्छ देऊन सहसचिव श्री.प्रसन्न तेरदाळकर यांनी तर सहा.व्यवस्थापक श्री.राजेंद्र शिखरे यांचे खजानिस श्री.कमलाकांत कुलकर्णी यांनी स्वागत केले. सेक्रेटरी प्रदीप व्हरांबळे यांनी आभार मानले.

यावेळी शिवाजी उद्यमनगर, वाय.पी.पोवारनगर,शिरोली, गोकूळशिरगांव, कागल एमआयडिसीमधील 42 कारखान्याचे मालक प्रतिनिधी उपस्थित होते.  यावेळी सर्व श्री.आनंद पेंडसे, शंतनू गायकवाड, मेनन ॲण्ड मेनन, मेनन बेअरिंग, पॉप्युलर स्टिल, घाटगे-पाटील,मेनन पिस्टन,मार्व्हलस फौंड्ी,एस.बी.रिशेलर, न्यू मेलटिंग सेंटर, कस्तुरी फौंड्ी, न्यू अनुकुल इंजिनिअर्स, मायक्रो मेटल इंड, आदित्य एंटरप्राईजेस, युनिमेटल सिस्टीम, समेरिका सेफ कंपनी, एस.जे.आर्यन ॲण्ड स्टिल, फायर फलाय पंप, अर्निमेक प्रॉडक्ट, टुलेक्स इंजि. प्रा.लि. व एच.आर.मॅनेजर उपस्थित होते.


KOLHAPUR ENGINEERING ASSOCIATION


GINEERING ASSOCIATION




KOL PUR ENGINEERING ASSOCIATION